# बाल समिति मार्गदर्शिक पुस्तिका

## संकल्पना

स्वच्छ विद्यालय ही ' स्वच्छ भारत : स्वच्छ शाळा' चलविणारी राष्ट्रीय मोहीम आहे. या मोहिमेचे मुख्य उद्दिष्टे असे आहे की भारतातील प्रत्येक शाळेत पाणी ,स्वच्छता आणि आरोग्य या सुविधा आणि वर्तन सुनीचित करणे शाळेमधील विद्यार्थ्यामध्ये स्वच्छते बाबत समज आणि जाणीव जागृती करून त्यांच्यात वॉश (पाणी,स्वच्छता आणि आरोग्य याबाबात वर्तन बदल करण्यासाठी शाळेतील विद्यार्थ्यांची समितीची स्थापना करून मुलांच्या मार्फत समवयीन मुलं/मुलीन पर्यन्त समज आणि जाणीव जागृती करून त्यांच्यातील वॉश परिवर्तन सुनीचित करणे. बाल समिति विदयार्थी व शिक्षकांमधील दुवा आहे. यांच्या माध्यमातून इतर विद्यार्थ्या मध्ये वॉश संदर्भात जाणीव जागृती करून त्यांच्या मध्ये वॉश वर्तन बदल करून त्यांना सशक्त बनवतील.

## बाल समितीचा मुख्य उद्देश

१. विदयार्थी ,शिक्षक ,शाळा व्यवस्थापन समिति सदस्य , पालक आणि गांव / वस्ती /समुदाय यांच्यात पाणी स्वच्छता आणि आरोग्य (वॉश) या विषयी जागरूकता करणे तसेच वर्तन बदल आणि वॉश परिपूर्ण सुविधा तयार करण्याची क्षमता तयार करून या प्रवाहामध्ये आणणे.
२. वॉश सुविधांचे नूतनीकरण आणि पुनर्रचना तसेच त्यांची देखभाल व दुरुस्ती करून वॉश सुविधा योग्य पद्धतीने टिकविणे.
३. वॉश सुविधाना विकसित करण्याबरोबरच योग्य अशी देखभाल, मूल्यमापन आणि टिकाऊपणा यासाठी कार्य बद्ध संरचना तयार करणे

या बाल समितीच्या माध्यमातून पाणी,स्वच्छता आणि आरोग्य यांच्या संदर्भातील वर्तन बदल होण्यास सहाय्यता होईल.तसेच पालकांमध्ये सुद्धा जागृत येण्यास

मदत होऊन त्यांचे देखील वॉश(पाणी,स्वच्छता आणि आरोग्य प्रती वर्तन बदल होईल.

## बाल समिति म्हणजे काय ?

बाल समिति ही शाळकरी मुलांची समिति आहे या मध्ये मुले आपली शाळा ,समाज,परिवार ,शिक्षण आरोग्य आणि आपले अधिकार या बाबत मोकळेपणाने एकमेकांच्या विचारांची देवाणखेवण करतील तसेच आपले मत मांडू शकतील.

## बाल समितीची स्थापना करणे का गरजेचे आहे

बाल समिति हा असा एक मंच विद्यार्थ्यांसाठी आहे की या माध्यमातून शाळेच्या व्यवस्थापन आणि विकास याबाबत आपले मत मांडू शकतील. तसेच त्याच्यातील जीवन कौशल्यातील गुणणा वाव मिळून त्यांच्यात – नेतृत्व क्षमता , निर्णय घेण्याची क्षमता,संवाद कौशल्य, आपल्या जबाबदऱ्या आणि भूमिका पार पडण्याची क्षमता निर्माण होऊन त्यांच्यातील व्यक्तिगत गुणांचा विकास होण्यास चालना मिळेल.

## बाल समिति काशी असावी

बाल समिति मध्ये १५ ते २० विद्यार्थ्यांचा समावेश असावा (शाळेच्या विदयार्थी संख्येनुसार बाल समिति मध्ये विद्यार्थ्यनाचा समावेश असावा).प्रत्येक वर्गातील दोन विद्यार्थ्यांचा समावेश असावा.या मध्ये पंतप्रधान, उपपंतप्रधान, भोजनमंत्री – उपभोजन मंत्री ,आरोग्य मंत्री - उपआरोग्य मंत्री, स्वच्छता मंत्री –उप स्वच्छता मंत्री , जलमंत्री–उपजलमंत्री,पर्यावरणमंत्री-उपपर्यावरणमंत्री,खेळमंत्री–उपखेळमंत्री,सांस्कृतिकमंत्री-उपसांस्कृतिकमंत्री,शिक्षण मंत्री- उपशिक्षणमंत्री या मंत्रिमंडळाचा समावेश बालसमिति मध्ये असावा.( प्रत्येक मंत्री मंडळात मुलगा आणि मुलगी असावे)

## बाल समितीची स्थापना काशी करावी

१. सुरुवातीला प्रत्येक वर्गात (५ वी ते १० वी) जाऊन विद्यार्थ्यांना उपक्रम विषयी सांगून उपक्रम संदर्भात प्रश्न मंजूषा घेऊन प्रत्येक वर्गातून ५ विद्यार्थ्यांची निवड करावी
२. त्यानंतर पाचही वर्गातील विद्यार्थ्यांना एकत्र बोलाऊन त्यात परत एकदा उपक्रम संदर्भात प्रश्न मंजूषा घ्यावी व त्यातून १५ विद्यार्थ्यांची निवड करावी (निवड समान निकषावर असावी)
३. १५ विद्यार्थ्यांची निवड झाल्यावर सर्व विद्यार्थ्यांना उपक्रमाचे उद्देश आणि हेतु समजाऊन सांगावे (म्हणजे विद्यार्थ्यंन मध्ये गोंधळ निर्माण होणार नाही)
४. उद्देश आणि हेतु सांगितल्यानंतर पंतप्रधान आणि उपपंतप्रधान या पदासाठी कोण उभे राहणार त्यांची नावे घ्यावीत (त्यानंतर त्यांना आपले चिन्ह ठरवायला लाऊन प्रचार करायला सांगणे) त्यानंतर बहुमताने बाल समितीचा पंतप्रधान आणि उपपंतप्रधान यांची निवड करून त्याच्या भूमिका व जबाबदऱ्या सांगव्यात.
५. पंतप्रधान आणि उपपंतप्रधान यांची निवड झाल्या नंतर इतर मंत्र्यांची निवड केली जाईल.
६. त्यानंतर पंतप्रधान आणि उपपंतप्रधान यांच्या माध्यमातून बाल समितीची बैठक बोलवून प्रत्येक मंत्र्याला त्याच्या भूमिका व जबाबदऱ्या सांगव्यात.
७. बाल समितीचा कार्यकाल हा एक वर्षाचा असेल.

## बाल समितीची संरचना आणि कार्य पद्धती

१. पंतप्रधान यांनी आठवड्यातून एकदा बाल समिति मंत्री मंडळा बरोबर बैठक घेणे अनिवार्य आहे.
२. पंतप्रधान यांच्या अनुपस्थिती मध्ये उपपंतप्रधान यांस बैठक घेणे अनिवार्य आहे.
३. बाल समितीच्या बैठकी मध्ये शिक्षक उपस्थिती असणे आवश्यक आहे.
४. या बैठकी मध्ये प्रत्येक मंत्री आपले काम कशा पद्धतीने चालू आहे हे समितीतील सर्व मंत्री मंडळाला संगेल.
५. प्रत्येक बैठकीचा अहवाल तयार करणे ही उपपंतप्रधान यांची जबाबदारी आहे .

६. प्रत्येक मंत्री हा त्याची भूमिका आणि जबाबदरी व्यवस्थित पार पडत आहेत का नाही हे पाहण्याची जबाबदारी पंतप्रधान आणि उपपंतप्रधान यांची आहे.

७. जर एखादा मंत्री आपल्या भूमिका व जबाबदऱ्या व्यवस्थित निभावत नसेल तर त्याला बरखास्त करण्याचा अधिकार पंतप्रधानास आहे . त्यानंतर मंत्री मंडळींच्या माध्यमातून दुसऱ्या व्यक्तीची नियुक्ती करणे .

**बाल समिति मंत्रीमंडळातील भूमिका आणि जबाबदारी**

**पंतप्रधान/ उपपंतप्रधान** :-

१. प्रत्येक आठवड्याला मंत्री मंडळाची बैठक बोलावणे व दोन महिन्यातून एकदा सगळ्या विद्यार्थ्यांना बरोबर बैठक बोलाऊन जे काम चालू आहे त्यावर सविस्तर चर्चा करणे तसेच पुढील कामाचे नियोजन करणे .
२. सर्व मंत्र्यांच्या कामाचे मूल्यांकन करून योग्य तो निर्णय घ्यावा.
३. शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकी मध्ये ज्या समस्या किंवा प्रश्न मांडणे व योग्य ती उपाययोजना जाणून घेणे.
४. प्रत्येक बैठकीचा अहवाल तयार करून त्यावर सर्व सदस्यांच्या सह्या घेऊन त्यामध्ये पुढील आठवड्या मध्ये कोण कोणती कामे करणार आहेत यांची उपाय योजना तयार करणे.
५. मंत्री मंडळानुसार कार्य सांगणे व त्यानुसार सूचना देणे.
६. शाळेमध्ये बाल समितीच्या सूचनेचा व स्वच्छता देखरेकीचा फलक लावणे.
७. एखादी व्यक्ति शाळेमध्ये आल्यावर संपूर्ण शाळा दाखवणे व समितीच्या मंत्रीमंडळाची ओळख करून देणे.
८. बाल समितीमधील सर्व मंत्री व उपमंत्री बॅच लावतात का नाही हे पाहणे.
९. उपपंतप्रधान याची मुख्य भूमिका अशी आहे की पंतप्रधानाच्या अणुउपस्थिती मध्ये समितीची सर्व व्यवस्था पाहणे.

**स्वच्छता मंत्री /उप स्वच्छता मंत्री** :-

१. विदयार्थी आणि सफाई कामगार यांच्याकडून संपूर्ण परिसराची साफ – सफाई काराऊं घेणे .

२. स्वच्छता मंत्री /उप स्वच्छता मंत्री यांची प्रमुख भूमिका असेल की इतर मुलांचे समूह तयार करून त्यांना त्यांचे काम पुढील प्रमाणे सांगणे वर्ग स्वच्छता ,परिसर स्वच्छता ,वसहतीगृह ,स्वयंपाक गृह (वर्ग चार कर्मचारी ),भोजनगृहाची साफसफाई ,शौचालय व मुतारी गृहाची स्वच्छता याची व्यवस्थित स्वच्छता होते का नाही यांची देखरेख करणे.

३. प्रत्येक वेळी साफ सफाई करणाऱ्या समूहाची आदला बदली करून त्यांना वेगवेगळी कामे देणे आणि बादलेल्या समूहाची बादललेली कामे बाल समितीच्या सूचना फलकावर लावणे.

४. पंधरा दिवसातून एकदा वसाहतीगृह व वर्ग खोल्या यांची व्यवस्थित साफ सफाई करून घेणे.

५. वर्ग खोल्या,शौचालय,स्वयंपाकगृह,स्नानगृह,परिसर या ठिकाणी कचरा पेटी ठेवणे / जर कचरा पेटी नसेल तर पंतप्रधान यांना सांगून उपलब्ध करून घेणे.

६. कचरा गोळा करणे,वेगवेगळा करणे आणि योग्य विल्हेवाट लावणे.

७. स्वच्छतेच्या ज्या सुविधा आहेत( झाडू ,सुपले , कचरा पेटी ) त्या योग्य ठिकाणी ठेवणे व मुले / मुली यांना त्याचा योग्य वापर करण्याची सवय लावणे .

८. शाळेमधील वेगवेगळ्या वर्गांमध्ये स्वच्छतेच्या स्पर्धा लावणे . प्रत्येक महिन्याला जो ग्रुप चांगल्या पद्धतीणे काम करत आहे त्यांना स्टार देणे व वर्षाच्या शेवटी ज्या गटाला सर्वात जास्त स्टार मिळतील त्यांना बक्षीस देणे.

९. उपस्वच्छता मंत्र्याचे काम असे आहे की स्वच्छता मंत्र्याच्या काममध्ये सहयोग करणे .ज्या वेळी स्वच्छता मंत्री नसेल त्यावेळी उप स्वच्छता मंत्र्याने कामे पहावीत .

**आरोग्य मंत्री - उपआरोग्य मंत्री:**

१. मुलं/ मुलींमध्ये कपडे,नख, दात, केस ,अंग यांची करून त्यांना वैयक्तिक स्वच्छता कशा प्रकारे ठेवावे यांची माहिती देणे व प्रत्येक वर्गातून २(एक मुलगा – एक मुलगी) प्रतिनिधीची नियुक्ती करून त्यांना दरोरोज कपडे,नख, दात, केस यांची पाहणी करून वही मध्ये नोंदणी करून ठेवणे .
२. प्राथमिक उपचार पेटी शाळा पातळीवर आहे का नाही यांची पाहणी करणे आणि व्यवस्थित ठेवणे .
३. शौचायल यांच्या जवळ साबण आहे का नाही ते पाहणे आणि नसल्यास उपलब्ध करून देणे .
४. जेवणाच्या आधी आणि जेवणानंतर हात धुतात का नाही याची पहाणी करणे तसेच हात धुण्याच्या पद्धती सांगणे (प्रत्येक वर्गातील मुलगा व मुलगी यांना जबाबदरी देणे प्रत्येक आठवड्याला बदलणे देखभाली साठी )
५. स्वयंपाकी आणि सफाई कामगार यांच्या वैयक्तिक स्वच्छतेची पहाणी करणे व त्यांना वैयक्तिक स्वच्छता यांचे महत्व समजाऊन सांगणे
६. मोठी मुले छोट्या मुलांच्या वैयक्तिक स्वच्छतेची काळजी घेतात का नाही हे पहाणे .
७. आरोग्य मंत्री - उपआरोग्य मंत्री यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे आरोग्य पाहणे जर एखादा विदयार्थी /विद्यार्थिनी आजारी असली तर शिक्षक,अधीक्षक ,अधिक्षिका यांना सांगावे.
८. आरोग्य मंत्र्याच्या गैहजारी मध्ये उप आरोग्य मंत्रीने सर्व कार्य सांभाळावे .

**पर्यावरणमंत्री-उपपर्यावरणमंत्री**

१. शाळेच्या आजूबाजूला झाडे लावणे किंवा विद्यार्थ्यांच्या सहभाने लाऊन घेणे तसेच झाडांच्या संरक्षणासाठी ताटी बंधने , त्यामुळे झाडे खराब होणार नाहीत आणि हिरवीगार राहतील .

२. शाळेतील प्रत्येक मुलाला झाड लावला सांगून त्याची देखरेक करायला सांगणे .
३. शाळेच्या परिसरातील झाडांची देखरेक करणे .
४. दरोरोज झाडाना पानी घातले आहे का नाही ते पाहणे
५. स्वच्छता मंत्री /उपस्वच्छता मंत्री यांच्या कार्यात मदत करणे

**जलमंत्री-उपजलमंत्री**

१. शाळेमध्ये , शाळेच्या परिसरात आणि जेवणाच्या ठिकाणी पिण्याच्या व्यवस्था आहे का नाही ते पाहणे त्याच बरोबर पाणी पिण्यासाठी ग्लास आणि पाणी घेण्यासाठी ओरगाळे (लांब दांडीचे भांडे ) आहे का नाही ते पहाणे आणि नसल्या उपलब्ध करून घेणे .
२. पिण्याच्या पाण्याच्या टाक्या,आपणी साठवण्याच्या टाक्या महिन्यातून दोन – तीन वेळ स्वच्छ केल्या जातात का नाही ते पाहणे . आणि त्याची नोंदणी वहीत करून ठेवणे .
३. पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणची स्वच्छता पाहणे . अस्वच्छ असल्या मुलांच्या मदतीने स्वच्छ करून घेणे .
४. पाईप लाइन कुठे तुटली असेल किंवा लिक होत असेल तर टी माहिती अधिक्षक आणि मुखयाद्यापक यांना सांगणे .
५. पिण्याच्या पाण्याचे नळ गळत असतील तर त्या विषयी माहिती अधिक्षक आणि मुखयाद्यापक यांना सांगणे .
६. जलमंत्र्याच्या गैहजारी मध्ये उप जलमंत्रीने सर्व कार्य सांभाळावे .

**भोजनमंत्री -उपभोजन मंत्री**

१. नाष्टा आणि जेवणाच्या वेळी सर्वांना रांगेत बसायला सांगणे (प्रत्येक वर्गाच्या मॉनिटरची मदत घ्यावी).
२. नाष्टाचे आणि जेवणाचे ताट स्वच्छ धुतले आहे का नाही ते पहावे .
३. नाष्टा आणि जेवणा आधी विद्यार्थ्यांनी सबनाणे हात धुतले आहे का नाही हे पाहणे यासाठी आरोग्य मंत्रीची मदत घ्यावी .
४. हात धुण्याच्या ठिकाणी पाणी आणि साबण उपलब्ध आहे का नाही हे पाहणे आणि उपलब्ध नसल्यास अधिक्षक आणि मुखयाद्यापक यांच्याकडून उपलब्ध करून घेणे .
५. स्वयंपाकी आणि जेवण वाढणारे यांनी स्वच्छ हात धुतले आहेत का नाही ते पाहणे .
६. विद्यार्थ्यांच्या ताटात जेवण शिल्लक कमी राहावे या विषयी माहिती स्वयंपाकी आणि जेवण वाढणारे यांना द्यावी .
७. जेवण झाल्यावर उरलेले अन्न व्यवस्थित एका डब्या मध्ये टाकायला सांगणे या वेळी स्वच्छता मंत्र्याची मदत घेणे.
८. स्वयंपाक घर आणि जेवण बनवण्याची भांडी स्वच्छ आहेत का नाहीत हे पाहणे आणि स्वच्छ नसल्यास स्वच्छ करण्यास सांगणे .
९. चपाती किंवा पोळी ज्या कापडावर ठेवतात ते दरोरोज स्वच्छ केले जाते का नाही ते पाहणे .
१०. भोजनमंत्रीच्या गैहजारी मध्ये उपभोजन मंत्रीने सर्व कार्य सांभाळावे .

**खेळमंत्री–उपखेळमंत्री**

१. विद्यार्थ्यांना खेळाच्या माध्यमातून वॉश विषयी माहिती द्यावी
२. वॉश विषयी जी खेळाची सामग्री आहे ती सामग्री खेळासाठी उपलब्ध करून द्यावी
३. १ ते ५ च्या विद्ययार्थयामध्ये खेळाच्या माध्यमातून जन जागृती करणे

४. महिन्यातून दोन वेळा वॉश विषयी स्पर्ध्यांचे आयोजन करणे .
५. खेळ मंत्रीच्या गैर हजारी मध्ये उप खेळ मंत्रीने सर्व कार्य सांभाळावे .

**सांस्कृतिकमंत्री-उपसांस्कृतिकमंत्री**

१. प्रत्येक आठवड्याच्या शनिवारी प्रत्येक वर्गाला वेगवेगळा विषय देऊन त्यावर चित्र , संदेश आणि गाणी तयार करायला सांगणे . त्यातील निवडक चित्र , संदेश आणि गाणी फलकावर लावणे.
२. वॉश विषयी उपक्रमाचे/कार्यक्रम आयोजन आणि नियोजन करणे (पंतप्रधानाच्या मदतीने)
३. वेगवेगळ्या स्पर्धेचे आयोजन करणे जसे – वर्ग सजावट ,वासहती सजावट , शाळा परिसर सजावट
४. भोजन मंत्री,स्वच्छता मंत्री आणि आरोग्य मंत्री यांना मदत करावी
५. सांस्कृतिकमंत्रीच्या गैरहजारी मध्ये उपसांस्कृतिकमंत्री याने सर्व कार्य सांभाळावे

**शिक्षण मंत्री- उपशिक्षणमंत्री**

१. सगळ्या वर्गांना आकर्षित करणे त्यासाठी आवश्यक चार्ट पेपर , खडू आणि मार्कर यांची उपलब्ध करून देणे .
२. विद्यार्थ्यांना हात धुणे , वैयक्तिक स्वच्छता , परिसर स्वच्छता , शौचालय स्वच्छता यांचे वारंवार प्रशिक्षण देणे .
३. सांस्कृतिकमंत्री व खेळमंत्री यांच्या कार्यामध्ये सहकार्य करणे .

४. शिक्षण मंत्र्याच्या गैरहजारी मध्ये उपशिक्षणमंत्री याने सर्व कार्य सांभाळावे